केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार राज्यात प्रादुर्भाव असलेल्या प्राणीजन्य आजारांचा आढावा घेऊन सदर आजारांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय प्राणीजन्य आजार समिती स्थापन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-०२१९/प्र.क्र.११४/आरोग्य -७**
१० वा मजला, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१.
दिनांक : २५ मार्च, २०१९.

**वाचा :-**

१) संचालक (आरोग्य सेवा), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/साथरोग कक्ष ६/SLZC आणि DLZC/७४६-४९/२०१८, दिनांक ०६ नोव्हेंबर, २०१८.
२) संचालक, राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र, स्वास्थ्य सेवा महानिदेशालय (भारत सरकार), दिल्ली यांचे पत्र क्र.Do.No.२८१०७/५/२०१८/ZON(P) NCDC, दिनांक ०२ जुलै, २०१८.
३) सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुटुंब कल्याण व साथरोग), मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/साथरोग कक्ष-६/SLZC व DLZC/शा.नि./३०-३२/१९, दिनांक ३१ जानेवारी, २०१९.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनूसार राज्यात प्रादुर्भाव असलेल्या प्राणीजन्य आजारांचा आढावा घेऊन सदर आजारांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय प्राणीजन्य आजार समिती स्थापन करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राष्ट्रीय प्राणीजन्य आजारांची स्थायी समितीच्या दि.११/१२/२०१७ रोजीच्या बैठकीत प्रत्येक राज्याने State Level Zoonosis Committee (SLZC) आणि District Level Zoonosis Committee (DLZC) स्थापन करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याबाबत संचालक, राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र, स्वास्थ्य सेवा महानिदेशालय (भारत सरकार), दिल्ली यांच्याकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या आहेत.

त्यानुषंगाने संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानूसार व प्रस्तावित केल्यानूसार राज्यात अस्तित्वात असणाऱ्या प्राणीजन्य आजारावरील कार्यक्षेत्रात सदर आजारांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी राज्यात State Level Zoonosis Committee (SLZC) आणि जिल्हास्तरावर District Level Zoonosis Committee (DLZC) समित्या स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:-

राज्य स्तरीय प्राणीजन्य आजार समिती (State Level Zoonotic Committee - SLZC) खालीलप्रमाणे स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समिती सदस्यांचे पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | अध्यक्ष |
| २ | संचालक, सार्वजनिक आरोग्य सेवा | सदस्य |
| ३ | संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन | सदस्य |
| ४ | आयुक्त/ संचालक पशुसंवर्धन आिण पशुवैद्यक सेवा | सदस्य |
| ५ | प्रादेशिक रोग निदान प्रयोगशाळा (असल्यास) | सदस्य |
| ६ | संचालक, राज्य पशुवैद्यक प्रयोगशाळा (असल्यास) | सदस्य |
| ७ | आयुक्त, अन्न व औषध प्रशासन | सदस्य |
| ८ | अतिरिक्त प्रधान मुख्य वनसंवर्धक, पर्यावरण, वने आणि वातावरणीय बदल प्रादेशिक कार्यालय (असल्यास) | सदस्य |
| ९ | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय | सदस्य |
| १० | प्राचार्य, पशुवैद्यक महाविद्यालय | सदस्य |
| ११ | विभाग प्रमुख, सार्वजनिक आरोग्य आणि सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय | सदस्य |
| १२ | विभाग प्रमुख, पशुवैद्यक आरोग्य आणि इतर विभाग, पशुवैद्यकीय महाविद्यालय | सदस्य |
| १३ | संचालक, आय.सी.ए.आर. पशुवैद्यक संस्था (असल्यास) | सदस्य |
| १४ | संचालक, आयसीएमआर अंतर्गत संस्था (असल्यास) | सदस्य |
| १५ | संचालक, पशुवैद्यक जैवपदार्थ निर्माण/ प्रख्यात औषध निर्माण कंपनी (असल्यास) | सदस्य |
| १६ | अतिरिक्त संचालक (पशुआरोग्य), राष्ट्रीय पशुरोग रिपोर्टींग प्रणाली, पशुसंवर्धन विभाग | सदस्य |
| १७ | नोडल ऑफिसर, राष्ट्रीय पशुरोग रिपोर्टींग प्रणाली (नॅशलन ॲनिमल डिसिज रिपोर्टींग सिस्टीम) पशुसंवर्धन विभाग | सदस्य |
| १८ | राज्य किटकशास्त्रज्ञ | सदस्य |
| १९ | राज्य सर्वेक्षण अधिकारी, आयडीएसपी, आरोग्य विभाग | सदस्य सचिव |

<u>राज्यस्तरीय समितीकडे असणारे विषय :-</u>

१. राज्यात अस्तित्वात असणाऱ्या प्राणीजन्य आजारामधील कार्यक्षेत्राबाबत सल्ला देणे आणि प्राणीजन्य आजार/ संसर्ग यांची प्राधान्य व महत्वानूसार विविध वर्गानूसार जसे जिवाणूजन्य, विषाणूजन्य, बुरशीजन्य, परजीवी याप्रमाणे वर्गीकृत यादी करणे आणि संशोधकांना समस्या प्राथम्याने सोडविणेबाबत मदत करणे.
२. विविध विभागांमध्ये जसे की, वैद्यकीय, पशुवैद्यक आणि संलग्न विभाग/ संस्था यामध्ये समन्वयाची क्षेत्रे व कार्यप्रणाली निश्चित करणे.
३. राज्यात प्रादुर्भाव असलेल्या प्राणीजन्य आजारांचा आढावा घेऊन त्याप्रमाणे संबंधित राज्यस्तरीय अधिकारी यांना सदर आजाराच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी विवक्षीत उपाय सुचविणे.
४. राज्यस्तरीय अधिकारी यांनी राज्यात उद्भवलेल्या, वारंवार उद्भवणाऱ्या प्राणीजन्य आजारांच्या प्रतिबंध व नियंत्रणासाठी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेणे.
५. जिल्हास्तरीय प्राणीजन्य आजार समितीकडून माहिती प्राप्त करुन त्यांना आवश्यक मुद्दयांवर मार्गदर्शन करणे.
६. वैद्यकीय व पशुवैद्यक व्यावसायिकांना एकत्रित प्रशिक्षण व क्षमता वाढविणेबाबत सल्ला देणे. निवडक प्राणीजन्य आजारांचे निदानासाठी राज्य अथवा प्रादेशिक स्तरावर विशेष प्रयोगशाळांची ठिकाणे व संख्या याबाबत मार्गदर्शन करणे.
७. प्राणीजन्य आजार संशोधन क्षेत्रातील व्यक्ती/ संस्था सहयोगासाठी निवडणे.

समितीची बैठक राजधानीच्या ठिकाणी वर्षातून किमान दोन वेळा घेण्यात यावी. यामध्ये कामाच्या प्रगतीचे मुल्यमापन आणि सहयोगाच्या नियोजनाचा आढावा घेण्यात यावा.

समिती सदस्यांच्या प्रवास/ दैनंदिन भत्त्याची प्रतिपूर्ती वेतन व भत्त्याच्या आहरणाच्या निधीतून करण्यात यावी.

**जिल्हास्तरीय प्राणीजन्य आजार समिती -**

जिल्हास्तरीय प्राणीजन्य आजार समिती (District Level Zoonotic Committee- DLZC) खालीलप्रमाणे स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | समिती पदभार |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ३ | जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४ | जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी | सदस्य |
| ५ | प्रतिनिधी, वनखाते | सदस्य |
| ६ | प्रतिनिधी, अन्न व औषध प्रशासन | सदस्य |
| ७ | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय | सदस्य |
| ८ | अधिष्ठाता/ प्राचार्य, पशुवैद्यकीय महाविद्यालय | सदस्य |
| ९ | विभाग प्रमुख, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय | सदस्य |
| १० | विभाग प्रमुख, पशुवैद्यकीय सार्वजनिक आरोग्य, पशुवैद्यकीय महाविद्यालय, | सदस्य |
| ११ | प्रतिनिधी, जिल्हा पशुवैद्यकीय अधिकारी/ जिल्हा सर्विलन्स अधिकारी | सदस्य |
| १२ | जिल्हा नोडल अधिकारी, पशुरोग सर्वेक्षण, पशुसंवर्धन विभाग | सदस्य |
| १३ | जिल्हा सर्वेक्षण अधिकारी, एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम | सदस्य सचिव |

**या समितीकडून हाताळावयाचे विषय खालीलप्रमाणे :-**

- जिल्ह्यातील प्राणीजन्य रोगाच्या कामाबाबत विविध स्तरावर सल्ला देणे व प्राणीजन्य रोग लागण/ रोग यांचे वर्गीकरण करणे जेणेकरुन समिती या आजारांच्या नियंत्रण व प्रतिबंधाबाबत प्राधान्याने कार्यवाही करु शकेल.

- राज्य समितीच्या सहकार्याने विविध विभागांना (उदा.आरोग्य, पशुपालन) त्यांच्या कार्यकक्षेप्रमाणे कामे सोपविणे.

- राज्यातील प्राणीजन्य रोगांचा आढावा घेणे व जिल्हास्तर अधिकाऱ्यांना अशा आजारांच्या नियंत्रण व प्रतिबंधात्मक उपाययोजना सुचविणे.

- जिल्ह्यातील प्रस्थापित व संभाव्य आजारांचे नियंत्रण व प्रतिबंध करणे, इतर विभागांनी, केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेणे.

- विभागातील प्राणीजन्य आजार नियंत्रणासाठी जिल्हा शीघ्र प्रतिसाद पथकाशी समन्वय ठेवणे.

- प्राणीजन्य रोगाच्या प्रयोगशालेय तपासणी व सर्वेक्षण यासाठी प्रयोगशाळांचा आढावा व स्थापनांच्या दृष्टीने आवश्यक पावले उचलणे.

- वैद्यकीय व पशुवैद्यकीय व्यावसायिक यांचेसाठी क्षमतावर्धन व प्रशिक्षण कार्यक्रम सुचविणे.

- वर्षातून किमान दोन वेळा बैठका घेणे.
- समिती सदस्यांना त्यांच्या वेतनाच्या अर्थशिर्षातून याकरीता भत्ते देण्यात यावेत.

प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. 201903161712502317 असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NILESH MADHUKAR FALAKE

Digitally signed by NILESH MADHUKAR FALAKE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9b937361525edcb194dec2d7985fb077e5abd6b9fad45b976539bce4d36b0b69, postalCode=400001, street=10TH FLOOR,G T HOSPITAL COMPLEX,NEW MANTRALAY,MUMBAI, serialNumber=e09d55875f0b34f40ea67d594e0e55772eb9527cde52579d6523580dfc4d1783, ou=PHD MANTRALAYA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=NILESH MADHUKAR FALAKE
Date: 2019.03.26 17:08:59 +05'30'

**( निलेश फाळके )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३) अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे.
४) सर्व सह संचालक (आरोग्य सेवा संचालनालया मार्फत)
५) सर्व सहसचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग.
६) उप संचालक, सर्व मंडळ कार्यालये.
७) सर्व जिल्हा शल्य चिकित्सक (FWB मार्फत)
८) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी (FWB मार्फत)
९) निवडनस्ती (आरोग्य-७)